# Procedure of Claiming an Unclaimed Deposit

आपले बँक खाते पुनरुज्जीवित करण्याची बँकेतर्फे संधी

ग्राहकांना त्यांच्या निष्क्रिय किंवा दावा न केलेल्या बँक खात्यांमधील पैसे परत मिळवण्यासाठी आपल्या बँकेने विशेष मोहीम सुरू केली आहे. अनेक वेळा ग्राहक जुनी खाती विसरतात किंवा दीर्घकाळ वापरत नाहीत, ज्यामुळे त्यातील रक्कम "डीईए फंड" (Depositor Education and Awareness Fund) मध्ये हस्तांतरित केली जाते. ही रक्कम तुम्हाला पुन्हा मिळवता येऊ शकते.

काय आहे प्रक्रिया?

जर तुमचे खाते दोन वर्षांपेक्षा जास्त काळ वापरलेले नसेल, तर ते 'निष्क्रिय खाते' मानले जाते. आणि जर दहा वर्षांपेक्षा जास्त काळ दावा न केलेली ठेव असेल, तर ती रक्कम भारतीय रिझर्व्ह बँकेच्या डीईए फंडात जमा केली जाते. मात्र ही रक्कम तुम्ही किंवा तुमचा कायदेशीर वारस कधीही परत मिळवू शकता.

Bank Account Revival

फक्त 3 सोप्या कृतीतुन दावा करा:

1. तुमच्या बँकेच्या कोणत्याही शाखेत भेट द्या (ती तुमची मूळ शाखा असणे आवश्यक नाही).
2. केवायसी कागदपत्रांसह (आधार, पासपोर्ट, मतदार ओळखपत्र किंवा ड्रायव्हिंग लायसन्स) फॉर्म सादर करा.
3. पडताळणी झाल्यानंतर, तुमची रक्कम (असल्यास) चालू खात्या व्यतिरिक्त व्याजासह परत मिळेल.